पान १ वरुन

## पाचशे रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ

तहसील कार्यालयातून प्रमाणपत्र मिळू शकणार आहेत. त्यामुळे दरवेळी पालकांचा होणारा ३-४ हजारांचा खर्च इथून पुढे होणार नाही. केवळ शैक्षणिकच नाही तर इतर अनेक कारणांसाठी प्रतिज्ञापत्र दाखल करताना ही सर्व प्रमाणपत्रे वेळोवेळी लागत असतात. त्यामुळे हा निर्णय राज्यातील कोट्यवधी नागरिकांसाठी लाभदायी असणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्याचे निर्देश मी महसूल खात्याच्या वतीने प्रशासनाला दिले आहेत, असे बावनकुळे यांनी एक्स अकाऊंटवर पोस्ट करत जाहीर केले आहे.

## पाकमध्ये दहशतवादी हल्ला, बारा जण ठार

दहशतवाद्यांनी इफ्तारनंतर बन्नू केंट या ठिकाणी असलेल्या सुरक्षा कड्यावर हल्ला केला. हल्ला करणारे सहा ते सात दहशतवादी होते अशीही माहिती समोर आली आहे. याआधी सोमवारी पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात एका महिला सुसाइड बॉम्बरने हल्ला केला. पॅरामिलिट्री फ्रंटियर कोअरवर हा हल्ला झाला होता. या हल्ल्यात एका सैनिकाचा मृत्यू झाला. त्यानंतर आता खैबर पख्तूनख्वा या ठिकाणी हल्ला करण्यात आला आहे.

## कामगार संघटनेची शासनविरोधात निदर्शने

निदर्शने केले. आमच्या मागण्या रास्त असून शासनाने या मागण्यांकडे लक्ष देऊन आमच्या समस्यांचे निराकरण करावे असे यावेळी सांगण्यात आले. यावेळी राज्य परिवहन महामंडळ कामगार संघटनेचे अध्यक्ष शरीफ मंसूरी ,सचिव प्रकाश ईशी, कार्याध्यक्ष हिरामण पाटील, खजिनदार संतोष पवार, उपाध्यक्ष राकेश बेडसे, राज्य क्यू आर.टी. सदस्य संजय मोरे, विभागीय कार्यकारणी सदस्य, जी.एस. ठाकरे, फिरोज मन्सुरी, कुणाल बारी, जितेंद्र राऊळ, अमोल साळुंखे, महेश अहिरे, अरुण पाटील व राज्य परिवहन महामंडळाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिलेकडे शरीरसुखाची मागणी

शकतो, असे सांगितले. शपरिणामी पीडित महिला ही घाबरली. तिला चक्कर येवू लागल्याने तिची तब्येत बिघडली. तिला लागलीच रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचार घेतल्यानंतर पीडितेने पिंपळनेर पोलीस ठाणे गाठले आणि फिर्याद दाखल केली. त्यानुसार काल मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास संशयित उमाकांत लक्ष्मण अहिरराव (रा.देगाव ता.साक्री) याच्या विरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. घटनेचा तपास सहायक पोलीस निरीक्षक किरण बर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदिप संसारे करीत आहेत.

## वस्तू व विक्री प्रदर्शनाचे आयोजन

ज्यूटच्या वस्तू, लाकडी वस्तू, दागिने, लेडीज बॅग, ड्रेस मटेरियल, साड्या आदि वस्तूंचा समावेश असणार आहे. या वस्तू केवळ वैशिष्ट्यपूर्णच नाहीत तर उच्च दर्जाच्याही आहेत. ग्रामीण कारागिरांचे कौशल्य आणि कारागिरीचे प्रदर्शन करतात. शिवाय, घरगुती मसाले, पापड, कुरडई आणि इतर खाद्यपदार्थ विक्रीचे स्टॉल असतील. हे स्टॉलवर अभ्यागतांना अस्सल ग्रामीण स्वादिष्ट पदार्थ चाखण्याची आणि खरेदी करण्याची संधी देतील. या प्रदर्शनाच्या माध्यमातून स्थानिक ग्रामीण महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी मोठया संख्येने प्रदर्शनला भेट द्यावी, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी नरवाडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार यांनी केले आहे.

## दुचाकींमध्ये धडक दोन ठार

भरधाव वेगाने जात होते. समोरून येणारी मोटर सायकल क्र. एमएच १८/एएच-४९४६ धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात धनंजय ऊर्फ मुन्ना जयवंत ठाकरे, आयुष धनंजय ठाकरे या दोघांचाही मृत्यू झाला तर यशोदा ठाकरे हि गंभीर जखमी झाली.या प्रकरणी साक्री पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## शिक्षक भारती संघटनेतर्फे आज..

करा. कर्मचारी अधिकारी सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करा, कोर्टकेस निर्णयाच्या अधीन राहून मागावर्गीय कर्मचा-यांचे पदोन्नती सत्र सुरु करा या मागण्या याशिवाय इतर मागण्या व स्थानिक पातळीवर समस्यांचा समावेश करून निवेदन देण्यात येणार आहे.

आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन राज्य शिक्षक भारती संघटनेचे राज्य संघटक सचिव अशपाक खाटीक, जिल्हाध्यक्ष आबासाहेब पाटील, नाशिक विभाग अध्यक्ष विनोद रोकडे, सचिव नानाभाऊ महाले, जिल्हा कार्याध्यक्ष खेमचंद पाकळे, उपाध्यक्ष सुधाकर पाटील, उर्दू विभागाचे मुस्ताक शेख, विनाअनुदानितचे अध्यक्ष कैलास अमृतकर, धुळे महानगराध्यक्ष सचिव गणेश माळी, महेंद्र जगताप, राहूल महाजन, धुळे तालुका अध्यक्ष किरण मासुळे, सचिव राजेश शिरुडे, दामोदर पाटील, साक्री तालुका अध्यक्ष जयवंत पाटील, सचिव संजय काकुळते, शिरपूर तालुका अध्यक्ष रावसाहेब चव्हाण, विजय सोनवणे, डी.बी.अहीरे, रविंद्र खरवंटे, सचिन जाधव, अजय पाटील, भुषण पवार, शैलेश धात्रक, पंकज जाधव, संदिप सोनवणे, संदिप नांद्रे, महिला आघाडीच्या वंदना हालोरे, अपर्णा पाटील, दिपाली चौधरी व आदींनी केले आहे.

## विविध संघटनांचे चिपको आंदोलन

करत तालुक्यात एकीकडे बारीपाड्यात वृक्ष संवर्धन करणाऱ्या निसर्ग मित्र चैत्राम पवारांना केंद्र सरकार पद्मश्री पुरस्कार देऊन गौरवित असतांना तालुक्यातच वैभवशाली वटवृक्षांची कत्तल केली जाते हा मोठा विरोधाभास असल्याचे स्पष्ट केले. प्रशासनाने हे वृक्ष जास्तीतजास्त वाचवण्याचा प्रयत्न करण्याचे व तुटी वृक्षांच्या संखेच्या दहा पटीत त्वरीत शाश्वत वृक्षांची लागवड करण्याची मागणी केली.

या आंदोलनात निसर्ग मित्र समितीचे जिल्हा उपाध्यक्ष विलास देसले, तालुकाध्यक्ष प्राचार्य बी.एम.भामरे, कार्याध्यक्ष व मार्गदर्शक सुरेश पारख, मनसेचे जिल्हा पदाधिकारी धीरज देसले, भ्रष्टाचार निर्मूलनचे राज्य पदाधिकारी अनिल देसले, तालुका निसर्ग मित्र समीती पदाधिका-यांत त्र्यंबक बोरसे, संजय बच्छाव, विद्यानंद पाटील, डॉ.अजय नांद्रे, सुहास सोनवणे, मनोहर भामरे, डॉ.मनिषा पाटील, नरेंद्र पगारे, सतिश पेंढारकर, सचिव चंद्रजीत भामरे, भरत बोरसे व खास धुळ्याहुन आलेले निसर्ग वेध संस्था व दक्ष नागरिक मंचचे सदस्य सचिन सोनवणे आदि हजर होते.

## गुन्ह्यांचा तपास तातडीने पूर्ण करावा

लवकरात लवकर चार्जशीट दाखल करावे. ज्या पीडीतांचे जातीचे दाखले प्रलंबित आहेत. त्यांच्या कागदपत्रांची पूर्तता करुन दाखले प्राप्त होण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करावा. ज्या पिडीतांचे अर्थसहाय्य देणे प्रलंबित असेल त्याची पूर्तता करण्याच्या सूचना यावेळी केल्यात. या बैठकीत अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम अंतर्गत विनयभंग, पोक्सो व इतर दाखल असलेल्या पोलीस तपासावरील नोव्हेंबर २०२४ मधील एक, जानेवारी २०२५ मधील तीन व फेब्रुवारी मधील चार अशा एकूण ८ प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यात आला.

## घरातील फ्रिजमध्ये शॉर्टसर्किटमुळे आग

कंदील परिसरातील पाच दुकाने शॉर्टसर्किटमुळे भस्मसात झाल्याची घटना ताजी असतांना मिल परिसरातील साईदर्शन कॉलनीत फ्रिजमध्ये शॉर्ट सर्किट होवून घरातील संसारोपयोगी साहित्य आगीच्या भक्षस्थानी सापडले. दिवसेंदिवस उष्णतेचे प्रमाण वाढत असून ईलेक्ट्रीक वस्तुंची घरातील साहित्य नागरिकांनी काळजीपूर्वक हाताळावे असे तंत्रज्ञांनी आवाहन केले आहे.

## सुलतानपूर आश्रमशाळा बालिका आत्महत्या..

आदेश दिले होते.त्यादरम्यान वर्ग शिक्षिकेचा शोध पोलिसांकडून सुरू असतांना दि. ३ मार्च रोजी तपासादरम्यान आश्रम शाळेची अधिशिका आकांक्षा देवी हिला रात्री पोलिसांनी अटक केली होती. म्हसावद पोलिसांनी विनोद पाटील व आकांक्षा देवी या दोघांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत जिल्हास्तरीय क्रीडा महाकुंभ स्पर्धांचे आयोजन; विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**धुळे, दि.५- राज्याच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या सहकार्यातून राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता, नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ४ ते ५ मार्च या कालावधीत जिल्हास्तरावर क्रीडा महाकुंभ स्पर्धा होत आहे. अशी माहिती इतिहासाचार्य राजवाडे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या अपर्णा कुलकर्णी यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.**

प्राचार्या अपर्णा कुलकर्णी यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले की, यावर्षीपासून राज्यातील संपूर्ण शासकीय तसेच निमशासकीय आयटीआय मध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या हजारो शिवकालीन, पारंपारिक, मैदानी खेळांचे आयोजन मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. यावर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झालेले आहेत तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून पारंपारिक क्रीडा महाकुंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडास्पर्धेच्या महाकुभासाठी प्रथमतःच पुणे येथील नामवंत क्रीडाभारती या क्रीडा संस्थेने सहभाग दर्शवीला आहे. या क्रीडा महाकुंभात मुलामुलींसाठी वैयक्तिक तसेच सांघिक स्वरूपात पंजा लढविणे, दंडबैठक, दोरीच्या उड्या, पावणखिंड दौड, लेझीम, लगोरी, लंगडी, रस्सीखेच, फुगडी, विटीदांडू हे शिवकालीन व पारंपरिक खेळ व त्यासोबत कबड्डी, खो खो ह्या प्रसिद्ध मैदानी खेळांचा अंतर्भाव केलेला आहे.

नवीन पिढीने मोबाईल मधील व्हिडिओ गेम न खेळता पारंपारिक भारतीय खेळ खेळावेत, नवीन पिढीला या खेळांचा परिचय व्हावा आणि या खेळातून आनंद मिळावा हा यामागील शासनाचा उद्देश आहे. अशा पद्धतीने निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. आज स्पर्धेच्या व धकाधकीच्या काळात युवावर्ग सकाळपासून ते सायंकाळपर्यंत अभ्यासवर्ग, ट्युशन आदी कामकाजामध्ये गुरफटून गेला आहे. खेळातून मुलांच्या शरीराचा व मनाचा विकास होत असतो. भारतात लोकप्रिय असलेल्या क्रिकेट, बॅडमिंटन, टेनिस, हॉकी या खेळांचे महागडे साहित्य, गणवेश इत्यादी या सर्व गोष्टी सर्वसामान्यांना परवडणाऱ्या नसतात. त्यामुळे पारंपरिक खेळ खेळणे अगत्याचे झाले आहे. परंपरागत व देशी खेळांमुळे मुलांमध्ये शारीरिक घटकांनुसार महत्त्वाचे फायदे होतात त्यामध्ये त्याला मूलभूत हालचालीचे कौशल्य, मानसशास्त्रीय फायदे व जीवन कौशल्य घेता येतात.

आज डीजेच्या गाण्यावर थिरकणाऱ्या तरुणाईला हा इतिहास समजून घेणे आवश्यक असल्याने राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता, नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून हा क्रीडा महाकुंभ १ ते ३ मार्च दरम्यान संस्थास्तरावर तसेच ४ ते ५ मार्च या कालावधीत जिल्हास्तरावर तसेच ७ ते ९ मार्च, २०२५ दरम्यान नाशिक येथे विभागस्तरावर होणार आहे. यामधील विजेते खेळाडू व संघाना आकर्षक पारितोषिके आयोजन समिती प्रदान करणार आहे. इतिहासाचार्य राजवाडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धुळे येथे वरील सर्व सामन्यांचे संस्थास्तरीय स्पर्धा आयोजन ३ मार्च, २०२५ रोजी करण्यात आले. तर जिल्हास्तरीय पारंपारिक स्पर्धांचे आयोजन ४ मार्च, २०२५ रोजी करण्यात आले. या स्पर्धा कौशल्य विकास व रोजगार खात्याचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या कार्यालयातील प्रतिनिधी अभय देशमुख, मनोज बागुल, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी तथा प्राचार्य सौ. अपर्णा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाल्या. यावेळी संस्थेचे गटनिदेशक एस. एन. इंगळे, जे. डी. पाटील, सी.एस. कुलकर्णी, डी. एच. देसले, एन. बी. सूर्यवंशी तसेच सर्व शिल्प निदेशक यांनी परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वीपणे पार पाडल्या.



# देवपूर मोमिन कब्रिस्तानमध्ये पेव्हर ब्लॉक कामाचा खा.डॉ.शोभाताई बच्छाव यांच्या हस्ते शुभारंभ

**धुळे, दि.५- देवपुरातील मोमिन कब्रस्तान येथे बसविण्यात आलेल्या पेव्हर ब्लॉक कामाचे उदघाटन खा.शोभा बच्छाव यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी रऊफ पाठण, या कामाचे सुचक तोसिफ खाटीक, मोमिन कब्रिस्तान ट्रस्टीचे हाजी जाहीद, हाजी हुसकोद्दीन, हाजी लुकमान, हाजी शकील, फारूक हाजी, इफ्फु अंन्सारी, यूसुफ - खाटीक, ललवा भैय्या, हाजी रफीक, माजिद अंन्सारी, हाजी गफूर, मोइन भाई, गुड्डू भाई, मुन्ना बापू, अशफाक हाजी, आवेश भाई, ताहिर भाई, राहील सर, सकलैन खाटीक आदीसह मुस्लिम बांधव उपस्थित होते. या कामासाठी नियोजन मंडळातून खासदार शोभा बच्छाव यांच्या शिफाराशीनुसार सुमारे वीस लाख रुपयाचा निधी उपलब्ध झाला होता. त्या कामाचा लोकार्पण सोहळा खासदारांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी देवपुरातील मोमीन कब्रस्तानचे ट्रस्टींच्या वतीने खासदार शोभा बच्छाव यांचा सत्कार करण्यात आला.

# देवमोगरा माता मुर्तीची विधिवत स्थापना; भंडाऱ्याने कार्यक्रमाची सांगता

**शहादा, दि.५ (प्रतिनिधी)- तालुक्यातील तलावडी येथे नुकतीच देवमोगरा माता पंचधातू मुर्तीची स्थापना करण्यात आली असून आज रोजी महाभंडाऱ्याने धार्मिक कार्यक्रमांची यशस्वी सांगता करण्यात आली.**



तलावडी येथील एका महिलेला ज्या ठिकाणी दृष्टांत झाला त्याच ठिकाणी गावकऱ्यांच्या सर्व संमती व श्रद्धेने देव मोगरा मातेच्या मूर्तीची स्थापना करण्याच्या निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी गुजरात राज्यातील देवमोगरा ता.सागबारा येथून देवमोगरा मातेची पंचधातूची मूर्ती आणण्यात आली होती. या देवमोगरा माता मूर्तीचा विधीवत अभिषेक करून तलावडी गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. त्यानिमित्त गाव दिवाळी व आदिवासी सोंगाड्या पार्टीचेही आयोजन करण्यात आले होते. आठवडाभराच्या धार्मिक कार्यक्रमांची दि.४ मार्च रोजी महाभंडाऱ्याने यशस्वी सांगता करण्यात आली. या भंडारासाठी जेष्ठ नेते सुभाष बुला पाटील (मडकानी), दिलीप प्रजापती, लक्कडकोटचे माजी सरपंच कांतीलाल रावताळे, पंकज कोळी, जय अंबे किराणा म्हसावद, एपीआय गुलाबसिंग पावरा, आडगावचे पोलीस पाटील मोतेसिंग खर्डे, म्हसावद येथील शेष व्हेजिटेबलचे मालक सतिलाल शेंबळे यांनी सहकार्य केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी पोलीस पाटील मोहनदादा सिंगा रावताळे, सरपंच हिम्मत फाड्या पावरा, उपसरपंच दिनेश विठ्ठल पावरा, ग्रामसेविका श्रीमती शकुंतला पाडवी, गाव डायला ब्रिजलाल पावरा, गाव पुजारा अस्तर पावरा, गाव वारती रावण पावरा, पुजारी तुळशीराम पवार, कैलास तुका पावरा, किरण पावरा, अमरसिंग पावरा, मगन पावरा, सागर पावरा, मानसिंग पवार, विष्णू पावरा, पिना ठाकरे, ब्रिजलाल पवार, हिरालाल पवार, सुदाम पवार, भयसिंग पवार, विजयसिंग वळवी, दिलीप पवार, पिऱ्या ठाकरे, सांबरसिंग पावरा, सुपडू पावरा, बन्सीलाल रावताळे, सुधीर पवार, रतन सरदार, अशोक ठाकरे, सभा पावरा, आधार मोरे, नारसिंग महाराज यांनी परिश्रम घेतले.

## निधन वार्ता

### शकुंतलाबाई बेडसे



साक्री, दि.५- पंचायत समितीचे माजी कार्यालयीन अधीक्षक संतोषतात्या बेडसे छडवेल कोर्डे कर यांच्या पत्नी शकुंतलाबाई बेडसे (वय ८०) यांचे दि.४ फेब्रुवारी रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्या धुळे जिल्हा परिषदचे अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक अनिल संतोष बेडसे व चंद्रकांत संतोष बेडसे यांच्या आई होत.

### प्रकाश मोरे



धुळे, दि.५- शहरातील नगरपट्टी येथील नॅशनल बेकरीचे संचालक प्रकाश बाबुराव मोरे यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुलं, एक मुलगी, नातवंड असा परिवार आहे.

पान १ वरुन

## गुंगीकारक औषधांचा साठा जप्त

आहे अशी माहिती समोर आली आहे. मोटारसायकलसह या मुद्देमालाची एकूण किंमत २९ हजार ३१० रुपये आहे. संशयित इरफान बाबूलाल मन्सूरी (वय ३४, रा.किस्मत नगर, शिरपूर) व शोएब अली सरफराज अली (वय २७, रा.गणेश कॉलनी, शिरपूर) यांच्याविरोधात शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## कारची झाडाला धडक एक ठार

रोजी साडेबारा वाजेच्या सुमारास भरधाव वेगाने जात होते. यावेळी रस्त्याच्या बाजुला असलेल्या निंबाच्या झाडावर भरधाव कार आदळल्याने अपघात झाला या अपघातात कार मधील पंडीत आसाराम डोंगरे (वय ३३)रा. संतोषी माता मंदिर गोपीकिसन नगर ता.जि.जालना यांचा मृत्यू झाला तर रमेश चव्हाण, योगेश पटवारी व सावळाराम डोंगरे हे तिघेही जखमी झाले. याप्रकरणी रमेश लालचंद चव्हाण यांच्या विरोधात शिंदखेडा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम; जिल्हास्तरीय मोहिमेचे उद्घाटन संपन्न

**धुळे, दि.५- राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम २.० अंतर्गत २ ते १८ वर्षे वयोगटातील बालकांकरिता राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या जिल्हा स्तरीय मोहिमेचे उद्घाटन १ मार्च रोजी जे.आर. सिटी हायस्कुल व ज्युनीअर कॉलेज, धुळे येथे तसेच राज्यस्तरावरुन ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे पुणे येथून उपमुख्यमंत्री व आरोग्य मंत्री यांच्या हस्ते संपन्न झाले.**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमात जिल्हास्तरावर एकुण १५०० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, आरबीएसके पथकातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत विद्यार्थ्यांचे वजन, ऊंची घेऊन सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात आली. किरकोळ आजारी विद्यार्थ्यांना शाळास्तरावर औषधोपचार देण्यात आले तसेच संदर्भसेवेसाठी पात्र विद्यार्थ्यांना (पान ३ वर)


**पाहिजेत**
वेटर पार्ट टाईम व फुल टाईम पाहिजे. समक्ष भेटा!
हॉटेल शांती सागर
पारोळारोड, धुळे

**पाहिजे**
वेटर पाहिजे
-: संपर्क :-
हॉटेल प्रिया
आकर्षक पगार दिला जाईल
8087564754

**संगणक ऑपरेटर पाहिजे**
MS ऑफिस/BCA/civil किंवा Computer Diploma डाटा एंट्री व कार्यालयीन काम ासाठी पूर्णवेळ अनुभव असल्यास प्राधान्य.
-: संपर्क :-
8625014012

**प्लॉट विकणे आहे**
सर्व्हे नं.४५३/अ/२ चाळीसगाव रोडटच प्लॉट विकणे आहे. डॉ.डि.वाय के बाजुमें
-: संपर्क :-
9421886965

**पाहिजेत**
कामासाठी मुले पाहिजेत.
संपर्क :- धुळे
9421526579

**पाहिजेत**
सिलेंडर वाटप कामासाठी ॲपे रिक्षा चालवणारा हुशार, होतकरु डिलव्हरी बॉय पाहिजे.
तिरुपती गॅस एजन्सी
गल्ली नं.२, पुर्ती बिल्डींग समोर, धुळे
8554982900
7875556589

**पाहिजेत**
विकास दूध पाऊच पॅकींग वाटपसाठी (पार्टटाईम) माणूस पाहिजे (दोन व्यक्ती)
पत्ता : विकास दूध
उषा ड्रेसेससमोर, ग.नं.२ ची बोळ, पारोळारोड, धुळे
समक्ष भेटा स.११ ते १२
9890030422
8600773021

**कार्टून पुठ्ठा रु.१६.०० प्रति किलो बंडल**
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे
फोन : 230540
9422296340

**- पाहिजेत -**
• नर्स/स्टाफ
• RMO
डे-नाईट शिफ्टसाठी अनुभवी उमेदवार पाहिजेत
इच्छूक उमेदवारांनी समक्ष भेटावे
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

**प्लॉट विकणे**
अग्रवाल नगर, वल्लभ नगर, महावीर सोसायटी, विशाल नगर येथील लहान मोठे प्लॉट विकणे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**ऑफिस भाड्याने देणे**
गल्ली नं.५ येथील नाकोडा कॉम्प्लेक्स जवळील दोन कॅबिन्स, वॉशरुमसह ६०० चौ.फू.जागा भाडे कराराने देणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**SVKM जवळ प्लॉट विकणे**
एसव्हीकेएम शाळेजवळ सुसज्ज वसाहतीतील प्लॉट्स विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**पाहिजेत**
कुलर कामासाठी
१) हेल्पर - ४ जागा
२) इलेक्ट्रीशियन- २ जागा
समक्ष भेटावे!
-: संपर्क :-
बांगड कुलर्स ॲण्ड फर्निचर्स
उदय बंगला, बँक ऑफ बडोदा शेजारी, मालेगावरोड, धुळे
9422288421

**पाहिजेत**
होलसेल मेडीकल दुकानासाठी
१) सेल्समन- BSC पास असल्यास प्राधान्य- २ स्वत:ची गाडी आवश्यक
२) हेल्पर - ३
समक्ष भेटा!
श्री साई फार्मा
ग.नं.५, बँक ऑफ इंडिया समोर, धुळे

**पाहिजेत**
दुकान कामासाठी अनुभवी हुशार माणूस - २
सेल्समन ग्रॅज्युएट - १ (अनुभवी)
-: संपर्क :-
7588517770
9850815243

**आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...**
atomberg "Why not?"








क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे ३* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरूरत नहीं होती है !
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०